International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगद

**श्री सोनवणे राजेंद्र रामचंद्र**

*इतिहास विभाग, एस वी के टी महाविद्यालय देवळाली कॅम्प नासिक*

*Corresponding Author – श्री सोनवणे राजेंद्र रामचंद्र*

**DOI - 10.5281/zenodo.18709592**

**प्रस्तावना :**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात अनेक समाज सुधारक व धर्म सुधारक होऊन गेले त्यात राजाराम मोहन रॉय स्वामी दयानंद सरस्वती महात्मा फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर,शाहू महाराज यांनी समाजातील वाईट चालीरीती नष्ट करून भारतीय समाजामध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचे काम केले तशाच प्रकारे नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे स्वातंत्र्य चळवळीततील कार्य महत्त्वाचे आहे. हे एक महान समाज सुधारक, राजकीय विचारवंत,अर्थतज्ञ, देशभक्त होते. ते महात्मा गांधीजींचे राजकीय गुरु होते तसेच त्यांच्या ज्ञानमूर्ती रानडे, दादाभाई नौरोजी यांचा प्रभाव होता ब्रिटिश सरकारने भारतीय जनतेवर मोठ्या प्रमाणावर अन्याय ,अत्याचार केला होता त्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी 28 डिसेंबर 1885 वर्षी मुंबईमध्ये राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना केली तेव्हा त्यामध्ये नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचा मोठा सहभाग होता 1885 ते 1905 हा कालखंड मवळांचा मानला जातो ह्या काळात भारतीयांच्या समस्या ब्रिटिश दरबारात मांडण्याचा प्रयत्न नामदार गोखले यांनी केला भारतीय तरुणांमध्ये राष्ट्रीय ऐक्याची भावना निर्माण करण्याचे काम नामदार करण्याचे काम नामदार गोखले यांनी केले त्यासाठी त्यांनी इसवी सन 1905 साली भारत सेवक समाजाची भारत सेवक समाजाची स्थापना केली.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

- भारतीय स्वातंत्र्यचळवळी तील नामदार गोपाल कृष्ण गोखले यांचे महत्व जाणून घेणे
- भारतीय लोकांमध्ये राजकीय आणि सामाजिक आर्थिक हक्काची जाणींव निर्माण करणे.
- हिंदू आणि मुस्लीम यांच्यात राष्ट्रीय ऐक्य निर्माण करणे
- हिंदी जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी बिटीश सरकारकडे पाठपुरावा करणे

**जीवन परिचय:**

नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचा जन्म 9 मे 1866 साली रत्नागिरी जिल्ह्यातील कोथळा या गावी झाला यांचे वडील कागल जिल्हा कोल्हापूर येथे फौजदार असल्यामुळे तेथेच त्यांचे बालपण तेथे गेले. महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूर येथील राजाराम विद्यालय डेक्कन कॉलेज पुणे व मुंबई येथे एलफिस्टन महाविद्यालयात झाले त्यानंतर त्यांनी 1885 साली पुण्याला डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या खाजगी संस्थेत न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षकाचे काम केले त्यानंतरच्या काळात भारतीय स्वतंत्र चळवळीमध्ये सहभाग घेतला.

**बनारस अधिवेशन:**

बनारस येथे भरलेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते 1885 साली राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली त्यावेळी ते संस्थापक सदस्य होते. नामदार गोपाळ कृष्ण गोखले मवाळ विचारसरणीचे नेते होते. इंग्रजांच्या न्याय बुद्धीवर त्यांचा विश्वास होता. इसवी सन 1905 च्या बनारस येथे राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये अध्यक्षीय भाषणात गोखले म्हणतात "खरी स्वदेशी चळवळ देशभक्ती आणि आर्थिक स्वावलंबनाची चळवळ आहे" गोखल्यांना भारताच्या आर्थिक समस्यांची जाणीव होती त्यासाठी त्यांनी स्वदेशीचे समर्थन केले बनारस येथील काँग्रेसच्या अधिवेशनात गोखलेंनी पुढील मागण्या मांडताना कायदेमंडळात भारतीय सदस्यांची संख्या वाढवणे, इंडियन कौन्सिल मध्ये कमीत कमी भारतीय सदस्य असावे, भारतीय प्राथमिक शिक्षणात वाढ करावी, लष्करावरील खर्च कमी करावा इत्यादी अनेक मागण्या ब्रिटिश सरकारकडे सादर केल्या आणि भारतीय लोकांना आपल्या सामाजिक आणि आर्थिक हक्काची जाणीव निर्माण करूनदिलेली आढळते

1906 च्या आपल्या अंदाजपत्रकीय भाषणात गोखले म्हणतात की " जनतेची स्तिथी सुधारणे आंणि सुशिक्षित लोकांमध्ये सामंजस्य निर्माण करणे हे दोन महत्त्वाचे प्रश्न ब्रिटिश शासनापुढे आहेत. त्यासाठी राज्य कारभारामध्ये भारतीयांचा सहभाग वाढवला पाहिजे असे गोखलेंना वाटत होते .

**भारत सेवकसमाजाची स्थापना:**

नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी भारतीय जनतेत राष्ट्रवादाचा पाया मजबूत करण्यासाठी भारतीय चळवळ सनदशीर मार्गाने चालवण्यास व देशांमध्ये सामाजिक कार्यकर्ते तयार करण्यासाठी 12 जून 1905 रोजी पुणे येथे भारत सेवक समाज या संस्थेची स्थापना केली. या संघटनेच्या माध्यमातून जातीभेद निर्मूलन करणे, वाईट चालीरीती समाजातून नष्ट करणे, लोकांमध्ये देश प्रेम देशभक्तीचे भावना निर्माण करणे हे उद्दिष्टे भारत सेवक समाज संस्थेची होते. या संस्थेची उद्दिष्टे होती. या संस्थेची इमारतीची कोनशीला शिवराम हरी उर्फ आबासाहेब साठे यांच्या हस्ते वसविली .या संस्थेचे गोळ कृष्ण देवधर, नरेश अप्पाजी द्रविड, अनंत विनायक पटवर्धन, नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे सदस्य व या संस्थेचे अध्यक्ष होते. या संस्थेच्या सदस्यांना सदस्य होण्यासाठीशपथ घ्यावी लागत असे.या संस्थेची उद्दिष्टे खालीलप्रमाणे

1. देश सेवा करताना स्वार्थी विचारांना थारा न देणे.
2. देशाच्या विकासासाठी सदैव प्रयत्न करणे
3. भारतीय समाजामध्ये जात, पंथ, धर्म याचा विचार न करणे.
4. भारतीय समाजामध्ये देशप्रेम व एकीची भावना निर्माण करणे. हे भारत सेवक समाज संस्थेचे उद्दिष्टे होते.

थोडक्यात भारता मध्ये समाज जागृती व राष्ट्रीय ऐक्य निर्माण करण्यासाठी हि संस्था स्थापन केली असावी असे या कार्यावरून दिसून येते. पुढील काळामध्ये भावी स्वातंत्र चळवळीची पायाभरणी या भारत समाजसेवक संघटनेने केली.

**वेल्बी कमिशन पुढील साक्ष:**

नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांची इ.स. 1895 साली वेल्बी कमिशन वर निवड झालेलेते सर्वात लहान सदस्य होते. तेव्हा त्यांनी सार्वजनिक खर्च व वित्त व्यवहार यावर आपले विचार मांडले. नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी ब्रिटिश सरकारला सांगितले की ब्रिटिश सरकारने भारतातील खर्चावर नियंत्रण ठेवले पाहिजे. खर्च हा वाढत आहे याचा आढावा घेतला.ब्रिटीश आणि भारत यांच्यातील

खर्चातील वाटणी कशी करावी यावर गोखलेंनी खालील उपाय योजना सांगितलेली आहेत.

1. लोकांकडून कराच्या रूपाने वसूल केलेला पैसा हा लोकांच्या हितासाठी खर्च करावा.
2. हिंदुस्थानाच्या राज्यकारभारावर ब्रिटिश इंग्लंडच्या पार्लमेंटचे नियंत्रण असावे.
3. ब्रिटिश लष्करावरील खर्च कमी करावा.
4. भारतीय राज्यकारभारातील वरिष्ठ जागा भारतीयांना द्याव्या.
5. भारताच्या अंदाजपत्रकावर भारतीय कायदेमंडळाचे नियंत्रण असावे असे गोखले यांनी वेल्बी कमिशन पुढे मांडले.

यावरून गोखले यांना भारतीय लोकांच्या सामाजिक हक्काची जाणीव किती होती हे वेल्बी कमिशनच्या साक्ष वरून दिसून येते

**हिंदू-मुस्लिम राष्ट्रीय ऐक्य:**

नामदार गोपाळ कृष्ण गोखले भारत सेवक समाज संस्थेचे कार्य करीत असताना आपल्या देशामध्ये हिंदू आणि मुस्लिम या दोन धर्मात मोठ्या प्रमाणात मतभेद आहेत .तर गोखले या संदर्भात म्हणतात 'आपण हिंदू आणि मुसलमान एक आहोत"दोन्ही धर्मांनी एकमेकांना सहकार्य केले पाहिजे देशांच्या विकासासाठी धर्मनिरपेक्षतेचे धोरण स्वीकारले पाहिजे. भारतीय समाजाचा विकासासाठी जातीभेद, मतभेद नष्ट केला पाहिजे अशी गोखलेंची मनापासून इच्छा होती म्हणून सर्व पंथीयांनी एकत्र येऊन आपल्यातील वैरभावना विसरून राष्ट्रवादी भावना निर्माण केली पाहिजे.त्यासाठी हिंदू व मुस्लिमांनी देश सेवेसाठी एकत्र आले पाहिजे तेव्हाच खऱ्या अर्थाने देशाचा विकास होईल.

सामाजिक विचारांच्या बाबतीत गोखले व टिळक यांच्यात मतभेद होते परंतु व्यक्तिगत स्वरूपाचे मतभेद नव्हते यासंदर्भात टिळकम्हणतात " राजनीती शास्त्रामध्ये आणि राज्यकारभारामध्येअध्यात्मिक आणि नैतिक भावनेला प्राधान्य देणारा एक सर्वोत्कृष्ट कार्यकर्ता" या शब्दात गोखलेंचा सन्मान. केला

**बंगालची फाळणी**

1899 साली लॉर्ड कर्झन हा हिंदुस्थानाचा गव्हर्नर जनरल म्हणून आला यांनी त्याने भारतीय जनतेवर मोठ्या प्रमाणात अन्याय अत्याचार केला. तसेच हिंदू आणि मुस्लिम यांच्यात एकी राहणार नाही यासाठी 1905 साली तेव्हा गोपाळ कृष्ण लॉर्ड कर्झन ने बंगालची फाळणी केली.तेव्हा गोपालकृष्ण गोखले यांनी लॉर्ड कर्झन च्या अन्यायी धोरणावर कठोर टीका केली व लॉर्ड कर्जनची तुलना औरंगजेबासी केली. लॉर्ड कर्झनला भारतीयांबद्दल आपुलकी ची भावना वाटत नव्हती म्हणून त्यांच्या काळात भारतात असंतोषाचे वातावरण तयार झाले होते.

**निष्कर्ष:**

थोडक्यात असे म्हणता येईल की गोपाळ कृष्ण गोखले हे एक समाज सुधारक राजकीय विचारवंत, देशभक्त, इतिहासकार, अर्थतज्ञ होते. त्यांनी राष्ट्र सभेच्या माध्यमातून जनतेच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. भारतीयांना ब्रिटिश प्रशासनास सामावून घेण्यासाठी आपले विचार मांडले त्यांनी हिंदू आणि मुस्लिम यांच्यात राष्ट्रीय ऐक्य निर्माण केले.तसेच भारतीय तरुणांमध्ये देशप्रेम निर्माण करण्यासाठी 1905 साली "भारत सेवक समाज" संस्थेची स्थापना केली. भारतीय लोकांना आपल्या राजकीय, सामाजिक, आर्थिक हक्काची जाणीव निर्माण करून दिली. भारतीय समाजाचा आर्थिक विकास व्हावा यासाठी स्वदेशी

चळवळीला महत्त्वाचे स्थान दिले. गोखलेंच्या सामाजिक योगदानाबद्दल विचारवंतांनी पुढील उदगार काढलेले आढळतात महात्मा गांधीजीं " भारताचे आदर्श समाजसेवक"म्हटले आहे पंडित नेहरू -गोखले हे "स्वराज्याचे श्रेष्ठ संदेश दूत होते" न.र. फाटक यांनी "बदलत्या युगाचे प्रतिनिधी होते" असे म्हटले आहे अशा अनेक विचारवंतानी नामदार गोखले यांच्या विचाराला महत्वाचे स्थान दिले भारतीय स्वातंत्र्यची चळवळीची पायाभरणी गोखलेंनी केली त्यामुळे पुढील काळात गती प्राप्त जाहली .

**संदर्भसूची:**

1. गद्रे आशा गोपाळ कृष्ण गोखले डायमंड पब्लिकेशन, पुणे
2. फाटक न,र. आदर्श भारत सेवक मुंबई 1967
3. डॉ. सुमन वैद्य,शांता कोठेकर -आधुनिक भारताचा इतिहास साईनाथ प्रकाशन,नागपूर
4. गोपाळ कृष्ण गोखले –चित्रशाळा प्रकाशन पुणे
5. जोशी लक्ष्मण शास्त्री-संपादक मराठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मितीमंडळ
6. गांधी मो.क. मुंबई सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथन रिया पब्लिकेशन कोल्हापूर 2023
7. गोखले पुरुषोत्तम 1966,नामदार गोपालकृष्ण गोखले,पुणेनिळकंठ प्रकाशन निळकंठ प्रकाशन